परळी **संघर्षनेता**
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
https://www.parlisangharshneta.in
9881265102 संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्ष- 11 वे | अंक क्र 59 | शुक्रवार दि. 13 मार्च 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060



# हवामान बदलावर नियंत्रणासाठी राज्याचा व्यापक आराखडा

## पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे



मुंबई, दि.12: हवामान बदल हा केवळ पर्यावरणाचा मर्यादित विषय नसून तो जगाच्या भवितव्याशी निगडित अत्यंत गंभीर आणि व्यापक व संवेदनशील प्रश्न आहे. या पार्श्वभूमीवर हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी महाराष्ट्र राज्याचा व्यापक आराखडा तयार असल्याची माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

नियम 92 अन्वये विधान परिषद सदस्य सुनील शिंदे यांनी याविषयी अर्धा तास चर्चा उपस्थित केली.

पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, 2021 मध्ये राज्याने हवामान कृती आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरु केली. त्यासाठी विशेष समिती स्थापन केली असून 350 हून अधिक तज्ज्ञ आणि अधिकारी या प्रक्रियेत सहभागी आहेत. केंद्र शासनानेही या आराखड्याला मान्यता दिली आहे.

2015 ते 2025 या कालावधीत आणि विशेषतः 2025 हे वर्ष सर्वाधिक उष्ण वर्ष ठरले. गेल्या 50 वर्षांत उष्ण आणि अतिउष्ण दिवसांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे अधोरेखित करत पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री मुंडे यांनी सांगितले.

पान 3 वर

# जातनिहाय जनगणनेबाबत सरकारचा मोठा खुलासा

## पहिल्या टप्प्यात जातीय जनगणना का नाही?



मुंबई : एप्रिलपासून सुरु होत असलेली राज्यातील जनगणना पहिल्या टप्प्यातील असून यामध्ये केवळ घरगणना होत आहे. त्यामुळे जाहीर झालेल्या अधिसूचनेत अनुसूचित जाती व जमाती वगळता इतर जातींच्या गणनेचा उल्लेख करण्यात आलेला नाही. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये जातनिहाय जनगणना होईल. त्याची अद्याप केंद्राकडून अधिसूचना निघालेली नाही. मात्र दुसऱ्या टप्प्यासाठीच्या अधिसूचनेमध्ये सर्व जातींची गणना करण्याचे नमूद असेल. जातनिहाय जनगणना व्हावी, अशी राज्य सरकारची भूमिका आहे, असे राज्याचे सांस्कृतिक मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी बुधवारी अर्थसंकल्पावरील सामान्य प्रशासन विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेच्या उत्तरामध्ये सांगितले.

मनुष्यवस्तीत शिरलेले मोठ्या संख्येने बिबटे सापडत आहेत. ते गुजरातमधील वनतारा या प्राणीसंग्रहालयामध्ये पाठवण्यात येत आहेत. 25 बिबटे नुकतेच वनतारामध्ये पाठवले असून आणखी 25 बिबटे पाठवण्याचे राज्याचे नियोजन आहे. बिबट्यांची राज्यातील भरमसाठ वाढ रोखण्यासाठी त्यांच्या संतती नियमनाची परवानगी केंद्राकडे मागितली आहे, असे वनमंत्री पान 3 वर

# आज ठळक

## गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत



- राज्यभर नियंत्रण कक्ष; जिल्हास्तरीय समित्या स्थापन
- गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध
- अत्यावश्यक सेवांना एलपीजी पुरवठा प्राधान्याने
- राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नाही
- समाजमाध्यमांवरील खोट्या/बनावट बातम्यांवर कारवाई
- अफवांवर विश्वास न ठेवण्याचे नागरिकांना आवाहन

मुंबई, दि.12 : इराण - इस्त्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत पान 3 वर



- मुंबई येथे ज्येष्ठ नेते रामरावजी वडकुते साहेब यांची राज्यसभेच्या खासदारपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांच्या दीर्घ राजकीय अनुभवातून राज्य व देशाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर साहेब, महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय आमदार गोपीचंदजी पडळकर साहेब, आमदार प्रवीण दरेकर साहेब आणि परळी वैजनाथ युवा नेते शिवदास बिडगर उपस्थित होते.

## विधानसभा लक्षवेधी

### मानखुर्दमधील एसएमएस एन्व्होक्लीनचा भस्मीकरण प्रकल्प 21 महिन्यांत हलविणार

## नियमभंग करणाऱ्या आरएमसी सिमेंट प्लांटवर दंडात्मक कारवाई करणार- पर्यावरणीय व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे



मुंबई, दि. 13 - मानखुर्द व शिवाजीनगर भागातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेऊन मानखुर्द शिवाजी विधानसभा क्षेत्रातील एसएमएस एन्व्होक्लीन कंपनीचे भस्मीकरण यंत्रणा अंबरनाथ औद्योगिक वसाहत येथे 21 महिन्यात स्थलांतरित करण्यात येणार आहे. तसेच येथील चार आरएमसी प्लांट बंद करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आरएमसी सिमेंट प्लांटवर दंडात्मक कारवाईसह खटले दाखल करण्यात येईल, अशी माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रात एसएमएस एन्व्होक्लीन कंपनीच्या कचरा जाळण्यामुळे व आरएमसी सिमेंट प्लांटमुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामासंदर्भात सदस्य अबू आझमी यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर पर्यावरण वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी उत्तर दिले.

श्रीमती मुंडे म्हणाल्या, या विषयावर संबंधितांबरोबर बैठक घेण्यात आली असून त्यात सदस्य अबू आझमीही उपस्थित पान 3 वर

## शिवसेना कुणाची? धनुष्य-बाण कुणाचा? दोन्ही गट अंतिम युक्तिवादासाठी तयार, कोर्टाने दिली पुढची तारीख



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 2022 मध्ये शिवसेनेतलं सर्वात मोठं बंड केलं. 40 आमदारांना घेऊन ते बाहेर पडले आणि थेट शिवसेना नेतृत्वाला म्हणजेच उद्धव ठाकरेंना आव्हान दिलं. दोन्ही पक्षांचा वाद निवडणूक आयोगाच्या दारात गेला तेव्हा निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि पक्षचिन्ह असलेला धनुष्य-बाण हे दोन्ही एकनाथ शिंदेंना दिलं. एकनाथ शिंदे जून 2022 ते ऑक्टोबर 2024 या कालावधीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. आता पान 3 वर

## परळी न.प. शिक्षण व सांस्कृतिक विभागाच्या वतीने "रद्दीत नको गरजूंना द्या!" – जुनी पुस्तके देऊन ज्ञानदानाचा अनोखा उपक्रम

- सभापती योगेश मेनकुदळे यांच्या संकल्पनेतून परळीत ज्ञानदानाचा अभिनव उपक्रम




परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- "रद्दीत नको... गरजूंना द्या!" या सामाजिक संदेशातून परळी वैजनाथ येथे शिक्षण व सांस्कृतिक सभापती योगेश मेनकुदळे यांच्या संकल्पनेतून एक प्रेरणादायी शैक्षणिक उपक्रम पान 3 वर

# गावच्या विकासाला खीळ : मनमानी कारभाराला कंटाळून हाळमच्या उपसरपंचाचा राजीनामा

## ➡ सत्ताधाऱ्यांच्या जाचातून गावाला मुक्त करणार -माधव मुंडे



परळी तालुक्यातील हाळमचे उपसरपंच देवनाथ सुखदेव दहिफळे यांनी आपल्या राजीनामा

परळी वैजनाथ (प्रतिनिधी): लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येताना गावकऱ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण होत नसल्याने आणि ग्रामपंचायतीच्या कारभारात होत असलेल्या अनियमिततेवर संताप व्यक्त करत, परळी तालुक्यातील हाळमच्या उपसरपंचाने थेट आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. देवनाथ सुखदेव दहिफळे असे या उपसरपंचाचे नाव असून, त्यांनी आपला राजीनामा गट विकास अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला आहे.

पत्रात ग्रामपंचायत प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून गावात ग्रामसभाच झाली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच ग्रामपंचायत कार्यालय नसणे, मासिक बैठकांचा अभाव, पथदिव्यांची दुरवस्था आणि स्वच्छतेचा प्रश्न यांमुळे ग्रामस्थ त्रस्त असल्याचे त्यांनी नमूद केले. केवळ मूलभूत सुविधाच नव्हे, तर महसुली कामांतही मोठा गोंधळ पान 3 वर

# जनतेच्या अडचणींकडे केंद्र सरकारचे दुर्लक्ष : खा.बजरंग सोनवणे

## ➡ संसदेत एलपीजी टंचाईच्या प्रश्नावर विरोधकांचे जोरदार निदर्शन




नवी दिल्ली : देशभरात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या वाढत्या टंचाईमुळे सामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून या प्रश्नावर संसदेतही जोरदार पडसाद उमटले. वाढती महागाई आणि गॅस सिलिंडरची टंचाई यामुळे सर्वसामान्यांचे घरगुती अर्थकारण कोलमडत असल्याचा आरोप करत विरोधी पक्षातील खासदारांनी संसद परिसरात जोरदार निदर्शने केली.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली विरोधकांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावेळी बीडचे खासदार बजरंग मनोहर सोनवणे पान 3 वर

# मौजे बेलंबा गावच्या पोलीस पाटीलपदी ज्ञानेश्वरी गिते (आंधळे) यांची निवड



परळी – शहरातील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. दत्तात्रय आंधळे यांच्या सुकन्या तथा बेलंबा येथील केदारिनाथ गीते यांच्या सुविज्ञ पत्नी ज्ञानेश्वरी केदारीनाथ गीते (आंधळे) यांची परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे बेलंबा गावच्या पोलीस पाटीलपदी निवड करण्यात आली आहे. शासनाच्या नियमानुसार पार पडलेल्या निवड प्रक्रियेनंतर दि. 10 मार्च 2026 रोजी त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा करण्यात आली. ज्ञानेश्वरीताई केदारनाथ गीते या गावातील सामाजिक कार्यात सदैव सक्रिय असतात. विविध सामाजिक, शैक्षणिक व ग्रामविकासाशी संबंधित पान 3 वर



# 'डेटा' 'डेटा' एक दिवस

ज्या वेळी एखाद्यास एखादी गोष्ट मोफत दिली जात असेल त्या वेळी मोफतच्या मोहाला बळी पडणारे हे खरे 'गिर्हाईक' असतात, हे वैश्विक सत्य. आपली तर जे जे मोफत ते ते पौष्टिक असे मानणारी संस्कृती. त्यामुळे आपल्याला या सत्याची प्रचीती वारंवार येते. विषय राजकारणाचा असो की ग्राहक-कारणाचा. 'एकावर-एक मोफत'पासून कशाचाही थेट मोबदला न मागता 'लाडकी बहीण' या जनतेच्या पैशाने घातल्या जाणार्या मासिक ओवाळण्यांपर्यंत मोफतोत्सव बारा महिने सुरुच असतो. जगाबरोबर आपणही जसे एकविसाव्या शतकात प्रवेश करते झालो तसे हा पुराणकालीन मोफतोत्सवही आपल्यासमवेत नव्या काळात आला. या आधुनिकोत्तर मोफतोत्सवाचे दृश्य स्वरुप म्हणजे मोबाइल कंपन्यांकडून देऊ केला गेलेला मोफत विदा. म्हणजे डेटा. मोबाइल फोन जसजसे हातोहात दिसू लागले तसतशी अधिकाधिक ग्राहक आकृष्ट करून घेण्याची स्पर्धा सुरु झाली. या स्पर्धेत दुनिया मुठ्ठी मे घेऊन झाल्यानंतरही जे काही उरलेसुरले तेही कब्जात घेण्यासाठी काही दूरसंचार कंपन्यांनी मोफत डेटा देण्याची टूम काढली. त्यांना बाजारपेठेचा अंदाज असल्याने ती चांगलीच लोकप्रिय झाली आणि डेटा मोफत आहे म्हणून दूरसंचार सेवा घेणार्यांची संख्या प्रचंड वाढली. तसेही आपल्या देशात रिकामटेकड्यांचे पीक भरपूर. हातास काम नाही आणि डोक्यास व्यवधान नाही अशा मोठ्या जनसंमर्दाने या मोफत डेटाचा लाभ घेतला आणि बघता बघता मोबाइल सेवा ही जगड्व्याळ बाजारपेठ उदयास आली. सोयीस्कर अफवा, मुद्दाम घडवलेल्या वदंता आदींच्या साहाय्याने निर्बुद्ध जल्पकांची एक पिढीच्या पिढी मोठी झाली. ती मतदार झाली. त्यांच्याकडून मतांची हवी तितकी बेगमी झाल्यावर, समाजात हवा तितका दुभंग निर्माण करण्यात यश आल्यानंतर या मोफत डेटाजीवींचा समाचार घेण्याची गरज सरकारला वाटली असणार. कारण या मोफत डेटाजीवींची गरज आता सत्ताधीशांस नाही. त्यामुळे त्यातूनच सरकारला उत्पन्नाचे एक नवे साधन दिसले. डेटा वापरण्यावर कर आकारणी, हे ते नवे साधन.

दूरसंचार खात्याच्या बैठकीत दस्तुरखुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच या कर आकारणीचा प्रस्ताव दिल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. सदरहू बैठकीस दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे आणि संबंधित खात्यांचे सर्व ज्येष्ठ पदाधिकारी, निती आयोगातील वरिष्ठ आदी अनेक उपस्थित होते. त्या बैठकीच्या प्रसिद्ध झालेल्या तपशिलानुसार पंतप्रधानांनी दूरसंचार खात्यास अशा डेटा कर आकारणीसंदर्भात प्रारुप तयार करण्यास सांगितले असून त्यात चांगल्या कामांसाठी आणि वाईट कामांसाठी डेटा वापरणार्यांची वर्गवारी केली जाणे अपेक्षित आहे. हे प्रारूप पुढील काही महिन्यांत आकारास येईल. त्यानुसार या कर आकारणीचा निर्णय होईल. अर्थात तूर्त चांगले काम आणि वाईट कार्य हे निश्चित कसे करणार इत्यादी तपशील उपलब्ध नाही. म्हणजे राजकीय पक्षांसाठी काहीही खोटेनाटे प्रसवणे, त्याचा प्रचार करणे हे काम सत्ताधार्यांसाठी होते की विरोधकांसाठी यावर ते चांगले का वाईट ठरणार किंवा कसे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. एखादा चित्रपट पाहण्यासाठी डेटा खर्च केला जात असेल तर त्या चित्रपटाचा नायक कवायतकार अक्षय कुमार आहे की शाहरुख खान यावर हा वापर चांगला की वाईट हे ठरवले जाणार किंवा कसे याबाबतही स्पष्टता नाही. सरकारच्या लेखी हा मुद्दा गौण असेल. तथापि ग्राहकांसाठी महत्त्वाची असेल ती डेटा वापरावरील कर आकारणी. भारतात हा असा डेटा वापरणार्यांची संख्या जगात सर्वाधिक असल्याने असा नावीन्यपूर्ण कर आकारला गेला तर सरकारदरबारी धो धो महसूल जमा होईल. या वृत्तातील तपशिलानुसार गेल्या वर्षात भारतातील सुजाण नागरिकांनी 22,900 कोटी गिगाबाइट (1 जीबी म्हणजे एकावर नऊ शून्ये) इतका डेटा ओरपला. म्हणजे सरकारने एक जीबी डेटा वापरावर एक रुपया इतका माफक कर जरी आकारला तरी सरकारच्या तिजोरीत केवळ एका वर्षात काहीही न करता 22,900 कोटी रु. वट्ट जमा होतील. वस्तू-सेवा करास पडलेले खिंडार, विविध कथित कल्याणकारी योजना, गावोगावी स्वच्छतागृहे उभारणी योजना इत्यादी धर्मकार्यार्थ पैशाची गरज सरकारला असल्याने या नव्या महसूल मार्गाचे स्वागतच जनता करेल शंका नाही. तसेही इतकी वर्षे मोबाइल ग्राहकांनी

मोफत डेटा भरभरून लुटला. आता देशाच्या हितासाठी त्यावर कर आकारणी सरकार करू पाहत असेल तर भगतगणांसह सर्व सुजाण नागरिक या करामुळे आनंदून जातील यात तिळमात्र शंका नाही. ज्यांनी इतके दिवस मोफत डेटा हा कसा 'मास्टरस्ट्रोक' आहे हे जनतेस पटवून देण्यात धन्यता मानली ते आता डेटा मोफत न देणे हा कसा 'मास्टरस्ट्रोक' आहे हे समजावून सांगण्यात आपले बुद्धिचापल्य पणास लावतील. असो. या बैठकीत अन्यही काही विषयांवर चर्चा झाली. उदाहरणार्थ मोठी खोगीरभरती ज्यात आहे अशा 'भारत संचार निगम लिमिटेड', म्हणजे 'बीएसएनएल' या कंपनीतून मनुष्यबळाची कपात करण्याच्या सूचनाही संबंधितांस या बैठकीत देण्यात आल्या. सरकारी मालकीच्या 'बीएसएनएल'ची आता पार रया गेली असून 'महानगर टेलिफोन निगम' म्हणजे 'एमटीएनएल' तर जिवंत आहे की मृत असा प्रश्न पडावा अशी स्थिती आहे. या दोन सरकारी कंपन्यांच्या अकाली मृत्यूचे श्रेय सरकारातील ज्येष्ठांस द्यावे लागेल. आधी काही सत्ताधारी आणि सरकारी अधिकार्यांनी खासगी दूरसंचार कंपन्यांच्या 'मुठ्ठी मे' जाण्यात धन्यता मानली. सरकारी कंपन्यांसाठी काम करता करता या खासगी कंपन्यांच्या भल्याचा विचार आणि तसे कृत्य करण्याचा घरभेदीपणा त्यांनी केला. त्यामुळे सरकारी कंपन्या दिवसेंदिवस मुडदुसावस्थेत जात असताना खासगी कंपन्या मात्र बाळसे धरत गेल्या. काही राजकारण्यांच्या 'महाजन'पणाची सुरुवातही त्यातून झाली. पुढे या सगळ्यांनी कट केल्यानुसार खासगी दूरसंचार कंपन्या गुटगुटीत होत असताना 'बीएसएनएल', 'एमटीएनएल' मरणपंथास लागल्या. आता त्यांचा अधिकृत अंत्यविधी तेवढा बाकी आहे. तोही लवकरच होईल. वास्तविक मध्यंतरी अश्विनी वैष्णव यांच्यासारख्या अभ्यासू मंत्र्याने 'बीएसएनएल'तर्फे 'फाईव्ह जी' सुरु करण्याची सर्व तयारी असल्याचे सांगितले होते. ही 'बीएसएनएल'ची 'फाईव्ह जी' सेवा सर्व खासगी दूरसंचार कंपन्यांच्या तोंडात मारेल इतकी तंत्रदृष्ट्या उत्तम असेल असा दावा त्यांनी केला होता. पण पुढे वैष्णव यांचा हा उत्साह मावळला असावा. कारण 'बीएसएनएल'च्या 'फाईव्ह जी' सेवेविषयी ना ते काही बोलतात ना त्यांचे सरकारातील सहकारी. म्हणजे प्रचलित 'धनरीती'प्रमाणे 'माय मरो, मावशी जगो' या तत्त्वानुसार 'बीएसएनएल', 'एमटीएनएल' मरो आणि मोजके खासगी जगोत हे उदात्त धोरण हाच 'वैष्णवाचा धर्म' हे सत्य सर्वांनी मान्य केले असणार. असो. या तत्त्वाने या खासगी कंपन्यांचे भले झाले, त्यांच्या मोफत डेटा जाहिरातीस भुलून त्यांना अतोनात ग्राहकही मिळाले. तेव्हा त्यानंतर या डेटा-वापरावर कर आकारणी करावी असे सरकारला वाटत असेल तर तेही रीतीनुसार झाले म्हणायचे. आधी आत घ्यायचे आणि एकदा का बाहेर जायचा मार्ग बंद झाला की आत आलेल्यांस पिळून काढायचे हे नवीन नाही. कशालाही भुलून 'आत येणारे' असतील तर त्यांच्या लुटले जाण्याचे दुःख तरी अन्यांनी का करावे? विंदांची कविता 'घेता घेता एक दिवस देणार्याचे हात घ्यावे' असा सल्ला देते. आपल्या खासगी दूरसंचार कंपन्या तेच करू पाहतात.

# मानवाच्या विवेकबुद्धीला आव्हान : युद्धाच्या आगीत जळतेय अमूल्य तेल!

**डॉ. भारत कऱ्हाड**



जगाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाणारे खनिज तेल (Crude Oil) आज युद्धाच्या राजकारणात अडकले आहे. मानवजातीच्या प्रगतीसाठी, उद्योगधंद्यांसाठी, वाहतूक व्यवस्थेसाठी आणि ऊर्जा निर्मितीसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले हे मौल्यवान नैसर्गिक साधन युद्धामुळे अक्षरशः उध्वस्त होत आहे. एका बाजूला तेलासाठी संघर्ष चालू आहे, तर दुसऱ्या बाजूला त्याच संघर्षामुळे तेलसाठे नष्ट होत आहेत— ही मानवी इतिहासातील मोठी विसंगती आहे.

जगातील अनेक मोठ्या युद्धांमध्ये तेल हा मुख्य घटक राहिला आहे. मध्यपूर्वेतील युद्धे, इराक-कुवेत संघर्ष, रशिया-युक्रेन युद्ध, तसेच विविध प्रादेशिक संघर्षांमध्ये तेलसाठे, पाइपलाईन्स आणि रिफायनरी यांना मोठे नुकसान झाले आहे. अनेक वेळा शत्रूला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करण्यासाठी तेलसाठ्यांवर थेट हल्ले केले जातात. त्यामुळे केवळ एका देशाचेच नाही तर संपूर्ण जगाचे नुकसान होते.

खनिज तेल निर्माण होण्यासाठी लाखो वर्षे लागतात. पृथ्वीच्या गर्भात साठलेले हे तेल अत्यंत मर्यादित आहे. त्यामुळे त्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे. पण युद्धाच्या वेळी तेलाच्या विहिरींना आग लावली जाते, पाइपलाईन्स उडवल्या जातात आणि तेलाचे मोठे साठे नष्ट होतात. 1991 मधील गल्फ युद्धात कुवेतमध्ये शेकडो तेलविहिरींना आग लावण्यात आली होती. अनेक महिने त्या जळत राहिल्या आणि वातावरणात प्रचंड प्रमाणात धूर व प्रदूषण पसरले.

युद्धामुळे तेलाचे उत्पादन थांबते किंवा कमी होते. यामुळे जागतिक बाजारात तेलाचे दर वाढतात. परिणामी पेट्रोल, डिझेल, गॅस, वीज आणि वाहतूक खर्च वाढतो. शेवटी त्याचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांवर होतो. महागाई वाढते, उद्योगधंदे अडचणीत येतात आणि आर्थिक अस्थिरता निर्माण होते.

तेलसाठे नष्ट होण्याचा पर्यावरणावरही मोठा परिणाम होतो. तेलविहिरी जळल्यामुळे वातावरणात कार्बन आणि विषारी वायू पसरतात. समुद्रात तेल गळती झाली तर समुद्री जीवसृष्टी धोक्यात येते. पक्षी, मासे आणि इतर जीवांचा मोठ्या प्रमाणावर मृत्यू होतो. त्यामुळे युद्ध हे केवळ मानवी जीविताचे नुकसान करत नाही तर पर्यावरणालाही दीर्घकालीन हानी पोहोचवते.

युद्धामुळे तेलाचा राजकीय वापरही वाढतो. अनेक देश ऊर्जा सुरक्षिततेसाठी इतर देशांवर अवलंबून राहतात. त्यामुळे तेल हा केवळ ऊर्जा स्रोत नसून तो राजकारण, अर्थकारण आणि सामरिक शक्ती यांचा केंद्रबिंदू बनतो. परिणामी तेलसंपन्न प्रदेशांमध्ये अस्थिरता कायम राहते.

आजच्या काळात जगाला एक महत्त्वाचा प्रश्न विचारावा लागेल— मानवजातीच्या प्रगतीसाठी असलेली नैसर्गिक संपत्ती आपण युद्धात का नष्ट करीत आहोत? तेलासाठी युद्धे लढली जातात आणि त्याच युद्धांमध्ये तेल जाळले जाते. ही परिस्थिती मानवाच्या विवेकबुद्धीला आव्हान देणारी आहे.

भविष्यातील पिढ्यांसाठी ऊर्जा स्रोत टिकवून ठेवण्यासाठी युद्धाऐवजी सहकार्याची गरज आहे. पर्यायी ऊर्जा स्रोत—सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जलविद्युत—याकडे जगाने गंभीरपणे वळले पाहिजे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर ऊर्जा संसाधनांचे संरक्षण करण्यासाठी कठोर नियम असणे आवश्यक आहे.

शेवटी असे म्हणावे लागेल की, युद्धात जिंकणारा कोणी नसतो— पराभव मानवतेचा आणि पृथ्वीच्या संपत्तीचा होतो. मौल्यवान खनिज तेल हे मानवजातीचे सामायिक संपत्ती आहे. त्याचे संरक्षण करणे ही सर्व देशांची सामूहिक जबाबदारी आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# खरे प्रेम सागरासारखेच खुप खोल!

## (13-18 मार्च:निस्वार्थ प्रेमभावना विशेष.)

आजच्या काळात जास्तकरुन प्रेम शब्दाला स्त्री व पुरुष यांच्या प्रेम प्रसंग-प्रणय यांच्याशी जोडून पाहिले जाते. परंतु प्रेम हे जगातील कोणत्याही वस्तुशी अथवा व्यक्तीशी होऊ शकते. प्रेमाच्या प्रभावानेच सृष्टीतील लोक एक दुसऱ्याची मदत करतात, एक दुसर्याच्या जीवनात सहयोग करता. याशिवायही प्रेमाचे अनेक रूप आहेत. जसे पतीपत्नीचे प्रेम, भाऊ बहिणीचे प्रेम, मित्रांचे आपापसातील प्रेम, प्रियकर आणि प्रेयसीचे प्रेम, गुरु आणि शिष्यचे प्रेम इत्यादी इत्यादी. प्रेमाशिवाय मनुष्य जीवन संभव नाही. म्हणूनच प्रेम हेच जीवन आहे, असे म्हटले जाते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खरे प्रेम हे नेहमी निस्वार्थ असते, स्वार्थी तर लोक असतात जे त्याला विकृत स्वरुप देतात. अशी उद्बोधक माहिती श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींच्या सदर लेखात जरूर वाचा... संपादक.

"खरा तो एकचि धर्म!
जगाला प्रेम अर्पावे!धृ.!
जगी जे हीन अतिपतित!
जगी जे दीन पददलित!!
तया जाऊन उठवावे!
जगाला प्रेम अर्पावे!!"

पूज्य साने गुरुजींनी तर मानवधर्मच प्रेमावर अवलंबून असल्याचे सांगितले आहे. प्रेम काय आहे? खऱ्या प्रेमाचे वर्णन करणे खुप कठीण आहे. खरे प्रेम त्या सागरासारखे आहे ज्याची खोली न मोजता येण्यासारखी आहे. खरे प्रेम ती भावना आहे जी एखादी वस्तू, व्यक्ती, स्थान, जीव अथवा ईश्वराविषयी तयार होते. प्रेमाचा सरळ संबंध भावनेशी आहे. प्रेमाचा हा सिद्धांत प्राणी आणि धार्मिक विश्वासांवरही लागू होतो. उदाहरण म्हणून एखादी व्यक्ती तिच्या कुत्र्याशी खुप प्रेम करते, स्वातंत्र्य सैनिकाला स्वातंत्र्याशी प्रेम आहे किंवा एखाद्या व्यक्तीला परमेश्वराशी प्रेम आहे. अशा पद्धतीने प्रेमाची विविध रुपे असतात. प्रेमाला विशिष्ट मर्यादेत बांधता येत नाही. प्रेम स्वछंद उडणाऱ्या पक्ष्याप्रमाणे स्वतंत्र असते. खरे पांडित्य अडिच अक्षराच्या प्रेमाभ्यासाने येते, असे संतशिरोमणी कबीरजी महाराज म्हणतात-

"पोथी पढ़ पढ़ जग मुवा|
पण्डित भया न कोय||
ढ़ाई अक्षर प्रेम का|
पढ़े सो पण्डित होय||"

प्रेमाचा खरा अर्थ निस्वार्थ भावनेने समोरच्याला सर्वस्व अर्पण करणे हाच आहे. आपल्या प्रेमीच्या हित आणि आनंदासाठी स्वतःच्या आनंदाचा त्याग करणे, खरे प्रेम आहे. प्रेम जीवन देते जीवन घेत नाही. प्रेम परमेश्वराने दिलेली समतुल्य, पवित्र आणि महान वस्तू आहे. मनुष्य या पवित्र प्रेमाला त्याच्या स्तरावरुन खाली ओढत आहे. मनुष्याने प्रेमाला इच्छा आणि वासना पर्यंत मर्यादित केले आहे. म्हणून आज हे स्वार्थीप्रेम हे हत्या आणि आत्महत्यांचे सर्वात मोठे कारण बनले आहे. प्रेम देणारा समर्पण भावनेने वागतो, मात्र प्रेम घेणारा आपले नाते- संबंध काय? हे विचारात न घेताच त्याचा गैरफायदा उठवतो. गुरु-शिष्य हे नाते मातृप्रेमाचे असते, मात्र संधीसाधू, भोंदूगुरु हा शिष्याच्या जवळिकतेच्याच सुवर्ण संधीप्रमाणे वाट बघत असतो. संधी हाती येताच तो हलकट-लंपट दुष्कृत्य, अत्याचार, अनाचार, भ्रष्टाचार वा बलात्कार करून पवित्र नाते कलंकित करतो. गुरुबंधू- गुरुसिख यांचे परस्परातील नाते हे बहिणभावाचे असावयास हवे, मात्र तेही असेच वासनांध भावनेतून स्वतःच्या उजळ रुपाला काळिमा फासून घेतात. अशा आपल्या दुर्व्यवहारी-व्याभिचारी वृत्तीने समाजाचे "शी-थूऽऽऽ..!" तोंडावर पाडून घेतात आणि आजिवन तुरुंगात सडतात. यामुळेच भक्तीमार्ग संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे. अशांना ज्ञानी- गुणी कोण म्हणेल? ईश्वर हे प्रेमाचेच नाव आहे, मग या विधानाची सत्यता गोत्यात तर येणारच ना!

"अनेकचित्त विभ्रांता मोहजाल समावृत्ताः।
प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ।।16।।"

(पवित्र श्रीमद् भगवद्गीता: अध्याय- 16: दैवासुर संपद्विभाग योग)

अर्थ: नाना प्रकारच्या कल्पनांनी भ्रमित, मोहाच्या जाळ्यांत पूर्णपणे गुरफटलेले आणि विषयभोगांत लंपट झालेले हे आसुरी स्वभावाचे लोक अखेरीस अमंगळ नरकांत रुततात.

जर तुम्ही कोणाशी खरे प्रेम करीत असाल, परंतु या गोष्टीपासून चिंतीत असाल की तुमचा प्रेमी देखील तुम्हाला असेच निस्वार्थ प्रेम करतो की नाही. तर चला आता आपण जाणून घेऊया की खरा प्रेमी अथवा प्रेमिकाचे गुण कोणते आहेत- सन्मान करणे: मान सन्मान कोणत्याही व्यक्तीचे आभूषण असते. जर तुमचा प्रेमी तुमचा खुप सन्मान करीत असेल व तुमच्या सोबतच इतरांशी देखील सन्मानाने वागत असेल तर तो व्यक्ती निश्चल मनाचा आहे. आजकाल अनेक प्रेमी- प्रेमिका आहेत, काही वरवर तर काही एक दुसऱ्यावर निस्सीम प्रेम करतात. परंतु लहान मोठ्या गोष्टीवर शिव्या देणे आणि चारित्र्यावर संशय घेणे असा त्यांचा व्यवहार असतो. जर एखादी व्यक्ती असे करीत असेल तर ती कपटी मनाची व स्वार्थी व्यक्ती आहे. स्वतःपेक्षा जास्त तुमच्यावर विश्वास ठेवणे: खरे प्रेमी स्वतःपेक्षा जास्त एकमेकांवर विश्वास ठेवतात. विश्वास ठेवल्याने एकमेकांमधील नाते आणखी मजबूत होते. जर तुमचा प्रेमी- प्रेमिका तुमच्यावर विश्वास ठेवत नसेल आणि तुमच्या लहान मोठ्या गोष्टीवर संशय करीत असेल, तर अशा व्यक्तीपासून दूर राहिलेलेच चांगले. काळजी घेणे: खरे प्रेमी- प्रेमिका एकमेकांची नेहमी काळजी घेतात. त्यांना स्वतःपेक्षा जास्त आपल्या प्रेमीची चिंता असते. जर प्रेमी- प्रेमिका वाईट परिस्थितीतून जात असेल, तर अशावेळी एक खरा प्रेमी नेहमी विश्वास आणि काळजी घेतो. एका आईप्रमाणे निस्वार्थ भावनेने आपल्या प्रेमीची काळजी करतो. नेहमी खरे बोलणे: खरा प्रेमी तुमच्याशी नेहमी खरे बोलेल. त्याचा काही भूतकाळ असेल, तर त्याबद्दलची माहिती तो तुम्हाला आधीच देईल. जर तुम्ही देखील कोणावर प्रेम करीत असाल परंतु त्याला आपला भूतकाळ सांगितला नसेल, तर न घाबरता सर्वकाही सांगून टाकावे. कारण खरे प्रेम हे शरीरावर होत नसून हृदयावर केले जाते. खरे प्रेम तुमच्या सर्व चुकांना माफ करायला तयार असते. प्रेमात नमुन जाणे: चूक कोणाचीही असो, परंतु एक खरा प्रेमी- प्रेमिका नाते वाचवण्यासाठी नेहमी माघार घेतो आणि "सॉरी- क्षमस्व" बोलतो. एका खऱ्या पार्टनरचे कर्तव्य आहे, की आपापसातील नाते खराब होऊ नये म्हणून कठीण परिस्थितीत माघार घेऊन नमुन जाणे. स्वातंत्र्य देणे: खऱ्या प्रेमात तुम्हाला संपूर्ण स्वातंत्र्य असते. खरे प्रेम एका स्वतंत्र पक्ष्याप्रमाणे असते, जो कुठेही उडू शकतो. कधीही निर्बंध लावून खरे प्रेम मिळवले जाऊ शकत नाही. खऱ्या प्रेमात प्रत्येकाला आपले विचार आणि धर्म-कर्म अशा प्रत्येक गोष्टीत स्वातंत्र्य असते. शेजाऱ्या पाजाऱ्यांवर प्रेम करण्यास सांगितले जाते, मग काय त्यांच्याशीही असलेच लंपट उपद्व्याप करा, असाच अर्थ घ्यावा काय?

"गॉड इज लव्ह; लव्ह इज गॉड!
सो लव्ह टु ऑल; लव्ह दाय नेबर्स!" (पवित्र बायबल)

कोणत्याही प्राणी, वस्तू, सजीव, निर्जीव इत्यादीबद्धल मनामध्ये आपुलकी, स्नेह, जिव्हाळा, आदर, निर्माण होणे आणि ती गोष्ट सहवासात, जीवनात हवीशी वाटणे म्हणजे प्रेम होय. आपले दैनंदिन जीवन जगत असताना सहवासात येणाऱ्या कोणत्याही गोष्टीशी भावनिक, मानसिक, शारीरिक, संबंध जोडले गेल्यामुळे निर्माण झालेला स्नेह म्हणजे प्रेम होय. मानवाच्या वयोगट व नातेसंबंधांनुसार प्रेमाचे स्वरुप असे असते- 1) स्नेह- प्रेमाचा हा प्रकार आपण आपल्याहून वयाने लहान असणाऱ्या व्यक्तीसोबत ठेवतो. यात एक काळजी किंवा माया असते. भूतदया किंवा पशुपक्षांबद्दल वाटणारी आपुलकी हीसुद्धा यात मोडते. 2) प्रेम- हा समान वयोगटातील व्यक्तींच्या दरम्यान असणाऱ्या संबंधांना दर्शवितो. याचे उपप्रकार म्हणजे भगिनीप्रेम, बंधुप्रेम, मित्रप्रेम इत्यादी. 3) आदर- हा प्रेमाचा प्रकार आपल्याहून वयाने मोठ्या अथवा ज्येष्ठ व्यक्तींकरता असतो. यातही संबंधित व्यक्तीची वाटणारी काळजी- विशेषतः त्यांच्या आवडी-निवडी व विचारांची ठेवतात. ही वागणूक त्यांच्या जीवनाच्या अनुभवाची आणि त्यांनी आपल्या केलेल्या संगोपनाबद्दलची एक पावती आणि क्वचित प्रसंगी त्यांना आवडणाऱ्या शिस्तबद्ध दिनचर्येची दखल असू शकते, उदा. बहिणभावाचे प्रेम, पितृप्रेम. पण हे सर्व प्रेमच! 4) ममता- हा तो प्रेमप्रकार की ज्याला अनुभवायला असे म्हणतात की देवही अवतार घेतात. गुरुला या मातृ प्रेमामुळेच "गुरुमाऊली" संबोधन चिकटले. स्त्रीला मातृत्व प्राप्त झाले की आपल्या बाळासाठी वाटणारे प्रेम म्हणजे ममता होय. 5) भक्ती- प्रेमाचे परमोच्च रुप की ज्याचे वर्णन केवळ अशक्य. परमेश्वर आणि साधक जेंव्हा एकरूप होतात तेंव्हा जो प्रेमप्रकार घडतो, तो म्हणजे भक्ती होय. त्यालाच प्रेमाभक्ती असेसुद्धा संबोधले जाते. हीच प्रेमाभक्ती म्हणजेच भक्त व भगवंताची एकरूपता होय. भिन्नता म्हणजे विभक्ती- परमेश्वर आणि भक्त दोघेही एकरुप होऊन आपापले वेगळे अस्तित्व घालवून परमोच्च एकरूपता अनुभवतात त्यासच भक्ती असे संबोधन आहे. 6) एकरुपता- प्रेम म्हणजे दोन जीव, नाते, संबंधी, एकत्र येऊन विचाराची देवाणघेवाण करतात, त्याच्या विचारातील एकता म्हणजे प्रेम होय. उदा.पतीपत्नी प्रेम. स्वार्थ- संधीसाधू व्यक्ती मात्र या पवित्र प्रेम स्वरुपांनाही एकाच पारड्यात तोलतो, प्रेमाला बदनाम करतो आणि सगळा घोटाळा होऊन बसतो. म्हणूनच मानवसमाज अशांची धिंड काढतो.

"प्रेम का जिसने मर्म न जाना वो बन्दा नादान है।
ईश्वर ही तो प्रेम है साधो प्रेम स्वयं भगवान है।
मतलब पर जो टिका है उसको प्रेम समझना भूल है।
प्रेम अगर निष्काम बने तो एक महकता फूल है।"

(पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र.198)

आजच्या काळात जास्तकरुन प्रेम शब्दाला स्त्री व पुरुष यांच्या प्रेम प्रसंग-प्रणय यांच्याशी जोडून पाहिले जाते. परंतु प्रेम हे जगातील कोणत्याही वस्तुशी अथवा व्यक्तीशी होऊ शकते. प्रेमाच्या प्रभावानेच सृष्टीतील लोक एक दुसऱ्याची मदत करतात, एक दुसर्याच्या जीवनात सहयोग करता. याशिवायही प्रेमाचे अनेक रुप आहेत. जसे पती पत्नीचे प्रेम, भाऊ बहिणीचे प्रेम, मित्रांचे आपापसातील प्रेम, प्रियकर आणि प्रेयसीचे प्रेम, गुरु आणि शिष्याचे प्रेम इत्यादी इत्यादी. प्रेमाशिवाय मनुष्यजीवन संभव नाही. म्हणूनच प्रेम हेच जीवन आहे, असे म्हटले जाते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खरे प्रेम हे नेहमी निस्वार्थ असते, स्वार्थी तर लोक असतात जे त्याला विकृत स्वरुप देतात. आता आपण प्रेमाचे दुसरे रुप म्हणजेच विकृत, वासनांध, प्रणयासक्त प्रेम होय. हे प्रेम मनुष्याचा स्वार्थ आणि अज्ञानामुळे निर्माण होते. या प्रेमाचे दुसरे नाव वासना असते. वासना हीच प्रेमाचे विकृत स्वरुप आहे. खोट्या प्रेमात इच्छा, क्रोध, दुःख आणि निराशा उत्पन्न होते आणि याच भावनांचे दुष्प्रभाव म्हणून अपराध आणि अधर्म यांचा जन्म होतो. हे प्रेम मनुष्याला आपल्या पतनाकडे घेऊन जाते. आज समाजात जे मानवी भावनांमध्ये असंतुलन तयार होत आहे, त्यामागील मुख्य कारण निस्वार्थ प्रेमाची कमतरता-अभाव होय. सामाजिक नात्यांची गोष्ट तर दूरच राहिली, परंतु आजकाल आई-मुलगा, पिता-पुत्री, भाऊ-बहीण, यांचे पवित्र प्रेम- माया, वात्सल्य, सहानुभूती आणि पती-पत्नी यांच्या समर्पण व निस्वार्थ प्रेमातही कमतरता निर्माण झाली आहे. अनेकानेक कारणांमुळे आजकाल प्रत्येक ठिकाणी प्रेमाविषयी तक्रारी ऐकायला येतात. काही लोकांना ईश्वरभक्ती तर काहींना प्रेम या शब्दांचा मोठाच तिरस्कार वाटू लागला आहे. काहींना प्रेम म्हटले की त्याच्या डोळोंडोळी विषयवासनाच दिसते. कारण त्यांना प्रेमाचा खरा अर्थ कधी समजलाच नाही; असे गृहीत धरणेच योग्य!

**श्री**
**कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**मु. रामनगर वॉर्ड नं.20, गडचिरोली.**
**पो. ता. जि. गडचिरोली.**
**फक्त व्हाट्सअॅप- 9423714883.**




# पोलीस स्टेशन धारूरचा अजब कारभार वाटमारी करणाऱ्या ईसमावर अर्ज दाखल करून सुद्धा काहीच कार्यवाही नाही

धारुर ( बाबुराव तिडके ) धारुर पोलिस स्टेशन सदैव कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते अन्याय झालेला तथा वाटमारी झालेला इसम पोलिस स्टेशन मध्ये गेला तर तेथिल कर्मचारी अर्ज करा तपास करून गुन्हा दाखल करु म्हणतात असाच एक अर्ज वाटमारी झालेला अनेक दिवसा पासून धारुर पोलिस स्टेशन येथे धुळखात पडुन आहे या अर्जावर तपास कामी म्हणून पो हे कॉ श्री शिवाजी सानप यांचे नाव अधोरेखित केलेली आहे पण हे तपासकामी असलेले सानप सांगतात मी ट्रनिंगला बीड येथे आहे




हा असा एकच अर्ज नव्हे तर अनेक प्रकरणे या पोलिस स्टेशमध्ये प्रलंबित असल्याचे दिसते तक्रारदाराला आज या उद्या म्हणुन पोलिस त्यांचा वेळ वाया घालविताना दिसतात असे प्रकरणे प्रलंबित असल्याने गुन्हेगारावर पोलिस प्रशासनाचा वचकच राहिलेला दिसुन येत नसल्याने अर्ज केला काय गुन्हा दाखल केला काय आमचे कोणी काहीच करु शकत नाही हे पाठबळ मात्र गुन्हेगारांना मिळताना दिसत आहे तरि जिल्हा पोलिस अधीक्षक श्री नवनित कॉंवत यांनी स्वःता लक्ष घालून धारुर पोलिस स्टेशनमध्ये प्रलंबित असणाऱ्या तक्रारींचे निराकरण करावे अशी मागणी धारुर तालुक्यातील जनतेतून होताना दिसत आहे

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

परळी संघर्षनेता

हॅलो बीड

शुक्रवार दि. 13 मार्च 2026



# वडवणीतील 5 व्या बौद्ध धम्म परिषदेचा उद्या समारोप; डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांचे मार्गदर्शन



वडवणी | सतीश मुजमुले बीड जिल्हा पश्चिम अंतर्गत वडवणी शहरातील नागवंशी बौद्ध विहार येथे दि. 5 मार्च 2026 पासून सुरु असलेल्या श्रामणेर शिबिराचा समारोप शनिवार, दि. 14 मार्च 2026 रोजी होणार आहे. या समारोप कार्यक्रमाला शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर (ट्रस्टी तथा राष्ट्रीय कार्याध्यक्ष व राष्ट्रीय अध्यक्ष, समता सैनिक दल) यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडणार आहे.


या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश खळगे सर असतील, तर स्वागताध्यक्ष म्हणून बाबासाहेब साळवे कार्य पाहणार आहेत. कार्यक्रमाला बी.एच. गायकवाड (राष्ट्रीय सचिव), भिकाजी कांबळे (राष्ट्रीय सचिव), अशोक केदारे (राष्ट्रीय महासचिव), अमरसिंग ढाका (राष्ट्रीय सचिव, संरक्षण महा), डी.एस. नरसिंगे (संघटक तथा प्रभारी बीड जिल्हा), बापूसाहेब गायकवाड (संघटक महाराष्ट्र राज्य तथा प्रभारी लातूर जिल्हा), महालिंग निकाळजे (अध्यक्ष बीड जिल्हा पश्चिम), बी.बी. धनवे (जिल्हाध्यक्ष बीड पूर्व), सिद्धार्थ जगझाप (सरचिटणीस बीड पश्चिम) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तसेच अरुणाताई निसर्गन (महिला जिल्हाध्यक्ष पश्चिम), कमलताई डोंगरे (महिला जिल्हाध्यक्ष पूर्व), वामनराव निकाळजे (जिल्हा उपाध्यक्ष संस्कार) आणि एस.बी. मोरे (जिल्हा उपाध्यक्ष संस्कार) यांचीही विशेष उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन शीला सुखदेव उजगरे (तालुका अध्यक्ष महिला), भारतीय बौद्ध महासभा वडवणी आणि नागवंशी बुद्ध विहार वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, यापूर्वी वडवणी तालुक्यात प्रा. प्रकाश खळगे यांनी पिंपरखेड येथे चार बौद्ध धम्म परिषदा आयोजित केल्या होत्या. मात्र, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर हे पहिल्यांदाच वडवणी येथे येत असल्यामुळे या पाचव्या ऐतिहासिक बौद्ध धम्म परिषदेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या परिषदेस तालुक्यासह जिल्हाभरातील भीमसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा साक्षीदार व्हावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीडमध्ये वनविभागाचे कृत्रिम पाणवठे कोरडेठाक; संकटातील वन्यजीवांची पाण्यासाठी वस्तीकडे धाव



बीड: उन्हाचा पारा वाढत असतानाच बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्रात वन्यजीवांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. वनविभागाने तयार केलेले कृत्रिम पाणवठे कोरडे पडल्याने हरिण, मोर, वानर यांसारखे वन्यप्राणी पाण्यासाठी आता मानवी वस्त्यांकडे आणि गावतलावांकडे धाव घेत आहेत. यामुळे वन्यजीवांचे प्राण धोक्यात आले असून वनविभागाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. करचुंडी वनक्षेत्रांतर्गत येणाऱ्या बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी आणि सोमनाथवाडी परिसरात वनविभागाने अनेक कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत. मात्र, कडक उन्हामुळे हे पाणवठे कोरडेठाक पडले आहेत. ज्या ठिकाणी पाणी शिल्लक आहे, तिथे महिनाभरापासून पाणी बदलले नसल्याने मोठ्या प्रमाणात शेवाळ साचले आहे. हे अस्वच्छ पाणी प्राण्यांच्या आरोग्यासाठी घातक ठरत आहे. पाण्याच्या शोधात वन्यजीव जंगलाबाहेर पडत असल्याने त्यांच्यावर भटक्या कुत्र्यांचे हल्ले होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच महामार्ग ओलांडताना अज्ञात वाहनांच्या धडकेत वन्यजीवांचा मृत्यू होण्याचा धोकाही निर्माण झाला आहे. “वनविभागाने केवळ नावापुरते पाणवठे न ठेवता त्यात नियमितपणे स्वच्छ पाणी सोडावे,” अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते पान 3 वर

# आनंदऋषिजी नेत्रालय अहिल्यानगर व अरिहंत जैन सेवाभावी संस्थेच्या वतीने

## रमाई प्रायमरी शाळेच्या विद्यार्थ्यांची करण्यात आली नेत्र तपासणी



परळी वैजनाथ,(प्रतिनिधी):- आनंदऋषिजी नेत्रालय अहिल्यानगर व अरिहंत जैन सेवाभावी संस्था परळी वैजनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.10) शहरातील पद्मावती विभागातील रमाई प्रायमरी अँण्ड प्ले स्कूलमध्ये विद्यार्थी व पालकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली.

शहरातील पद्मावती विभागातील रमाई प्रायमरी अँण्ड प्ले स्कूल येथे नेत्रतज्ञ डॉ.गणेश तवले यांनी विद्यार्थी व पालकांच्या डोळ्यांची तपासणी केली. यात सुमारे 225 विद्यार्थी व पालकांची नेत्र तपासणी करण्यात आली व योग्य ते उपचार, काळजी घेण्याबाबतचे मार्गदर्शन करण्यात आले. त्यासाठी त्यांना कुंदन शिंदे, अरुण वाघमारे, गणेश घोलप आदींनी सहकार्य केले.

याप्रसंगी रमाई प्रायमरी अँण्ड प्ले स्कूलचे संचालक संजय शामराव देशमुख यांच्या हस्ते या नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. पान 3 वर


# मान्यवर कांशीराम साहेब यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे विशेष साप्ताहिक अभ्यास वर्गाचे आयोजन



परळी /प्रतिनिधी मान्यवर कांशीराम साहेब यांच्या जयंतीनिमित्त 15 मार्च 2026 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे “स्टुडंट्स फॉर रिकन्स्ट्रक्शन ऑफ सोसायटी” या “फुले-आंबेडकरी अभ्यास समुहाच्या” वतीने साप्ताहिक अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती या अभ्यास वर्गाचे संयोजक अरविंद खैरनार यांनी दिली आहे.

15 मार्च 2026 रोजी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृह, शिवाजी हायस्कूलच्या बाजूला, खोकडपूरा येथे सकाळी 9:40 वाजता “मान्यवर कांशीराम साहेबांकडून आपण काय शिकावे?” किंवा “राजनीति चले ना चले, सरकार बने ना बने, सामाजिक परिवर्तन की गती किसी भी किमत पर रुकनी नही चाहिए!.... मान्यवर कांशीराम साहेब” या विषयावर हा विशेष साप्ताहिक अभ्यास वर्ग संपन्न होणार आहे. या विशेष साप्ताहिक अभ्यास पान 3 वर

# केज तालुक्यातून पुन्हा दोन मुली बेपत्ता; 14 वर्षांच्या मुलीसह 18 वर्षांच्या तरुणीचे अपहरण?



केज (जि. बीड): केज तालुक्यातून दोन वेगवेगळ्या गावांतील दोन मुली बेपत्ता झाल्याच्या घटना समोर आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. बेपत्ता झालेल्यांमध्ये एक 14 वर्षांची अल्पवयीन मुलगी असून दुसरी 19 वर्षांची तरुणी आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या एका तरुणीने आंतरजातीय विवाह केल्याचेही आता समोर आले आहे.

पहिली घटना: मध्यरात्री मुलगी गायब

तुकुचीवाडी येथील इयत्ता 8 वीत शिकणारी 14 वर्षांची मुलगी बुधवारी (11 मार्च) मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास आईजवळ झोपलेली होती. तिचे वडील शेतातून घरी परतले असता मुलगी घरात नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. नातेवाईकांकडे शोध घेऊनही ती न सापडल्याने अखेर अज्ञात व्यक्तीविरुद्ध पान 3 वर

# श्रीमती मंदोदरी घोंगडे यांचे वृद्धापकाळाने निधन



परळी/प्रतिनिधी

वीरशैव लिंगायत समाजातील जेष्ठ श्रीमती मंदोदरी परमेश्वरअप्पा घोंगडे यांचे आज गुरूवार दिनांक 12 मार्च रोजी सायंकाळी 5.30 वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. नगर परिषदेचे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी श्री सिध्देश्वर घोंगडे यांच्या मातोश्री होत.

श्रीमती मंदोदरी परमेश्वर घोंगडे रा.खंडोबा मंदिरच्या पाठीमागे, सावतामाळी मंदिर रोड, परळी वैजनाथ यांचे आज गुरूवारी वृद्धापकाळाने निधन झाले. श्रीमती मंदोदरी घोंगडे या अत्यंत प्रेमळ स्वभावाच्या असल्याने सर्वपरिचित होत्या. वीरशैव लिंगायत समाजाच्या विविध धार्मीक व सामाजिक कार्यात त्या नेहमी सक्रीय सहभागी असत. त्यांच्या पश्चात नगर परिषदेचे पाणी पुरवठा पान 3 वर

# महिला दिन हा केवळ उत्सव नाही, तर स्त्रीशक्तीच्या कर्तृत्वाचा गौरव आहे – सौ. माधुरीताई तांदळे

## संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात कर्तृत्ववान महिलांच्या प्रेरणादायी कार्याला सलाम करत ‘जागतिक महिला दिन’ उत्साहात साजरा




## भक्ती, शक्ती, संस्कृती व शिक्षण उन्नतीचा संदेश देत कर्तृत्ववान महिलांच्या रूपरेखांसह भव्य प्रभात फेरीने परळीकरांचे वेधले लक्ष

परळी (प्रतिनिधी) – स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नसून समाजाच्या प्रगतीचा भक्कम पाया आहे. तिच्या कर्तृत्वामुळेच समाजाला नवी दिशा मिळते. स्त्रीच्या सामर्थ्याचा सन्मान आणि समाजात स्त्रीविषयी आदराची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभाग येथे श्री पद्मावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री कैलास तांदळे व सचिव श्री दीपक तांदळे यांच्या संकल्पनेतून व मुख्याध्यापिका सौ. माधुरी ताई तांदळे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय महिला दिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांचे प्रतिमापूजन करण्यात आले.

यावेळी महिला दिनानिमित्त शाळेच्या विद्यार्थ्यांनी एक अनोखा आणि समाजजागृती करणारा उपक्रम राबवला. विद्यार्थ्यांनी शिक्षण, विज्ञान, क्रीडा, कला, सामाजिक कार्य, प्रशासन, भक्ती, शक्ती अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या संघर्ष आणि यशाची प्रेरणादायी झलक सुंदर फलक, पोस्टर्स आणि संदेशांच्या माध्यमातून साकारली. या माध्यमातून “स्त्री म्हणजे शक्ती, प्रेरणा आणि प्रगतीचा मार्ग” हा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचा पान 3 वर

# जीव वाचवण्यासाठी कुऱ्हाड वापरा, अन्याय सहन करू नका : प्रा. लक्ष्मण हाके

## आरोपींना चार दिवसांत अटक न झाल्यास माजलगाव पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्याचा इशारा



माजलगाव : राज्यात मेंढपाळांवर होत असलेल्या हल्ल्यांच्या घटनांबाबत तीव्र संताप व्यक्त करत ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी धनगर समाज बांधवांना अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले. “महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे की नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. वारंवार मेंढपाळांवर हल्ल्याच्या घटना घडत आहेत. समाज बांधवांनी अन्याय सहन करू नये. आपल्या हातात मेंढ्यांसाठी वापरली जाणारी कुऱ्हाड गरज पडल्यास स्वतःचा जीव वाचवण्यासाठी वापरा. मी चिथावणी देत नाही, तर जबाबदारीने बोलत आहे,” असे विधान त्यांनी केले.

माजलगाव तालुक्यातील घळाटवाडी येथे मेंढपाळ बांधवांवर झालेल्या मारहाणीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रा. हाके यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यास भेट देत अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. “पोलिसांचा धाक आरोपींवर राहिलेला दिसत नाही. समाजाच्या न्यायासाठी आवाज उठवणारे आम्ही बांगड्या भरलेल्या नाहीत,” असेही त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

यावेळी प्रा. हाके यांनी मारहाणीत जखमी झालेल्या बीटे बंधूंच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांना धीर दिला. पान 3 वर

# विश्वास पाटील यांची सोमेश्वरनगरीस सदिच्छा भेट



महेंद्र गोदाम ग्रामीण प्रतिनिधी: घाटनांदुर अंबाजोगाई घाटनांदूर येथे 99 व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तथा दिग्गज कादंबरीकार विश्वास पाटील यांनी घाटनांदूरनगरीस भेट दिली असता त्यांचा सत्कार करण्यात आला.

येथिल माजी सरपंच ज्ञानोबा (बप्पा )जाधव यांचे सन्मित्र रामराव गित्ते यांचे पानीपतकार तथा 99 व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांचेशी ऋणानुबंध असल्याने ते माऊली पेट्रोलियमवर आले होते. यावेळी त्यांचा शाल, श्रीफळ, बुके व सोमेश्वर महाराजांची प्रतिमा देवुन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रस्ताविक करताना पत्रकार गणेश जाधव यांनी पान 3 वर

# सामाजिक बांधिलकी! केजमधील नागरिकांची तहान भागणार; व्यापाऱ्यांकडून पोलीस स्टेशनला वॉटर कुलर भेट




प्रकाश मुंडे/केज तालुका प्रतिनिधी आपल्या समाजउपयोगी उपक्रमांनी सतत क्रियाशील असलेल्या येथील व्यापारी महासंघाच्या वतीने केज पोलीस स्टेशनला ‘वॉटर फिल्टर विथ कुलिंग सिस्टम’ भेट देण्यात आली. या सुविधेचा लोकार्पण सोहळा गुरुवार, दि. 12 मार्च रोजी पोलीस ठाण्याच्या आवारात मोठ्या उत्साहात पार पडला.

नागरिकांच्या सुविधेसाठी पुढाकार

केज पोलीस स्टेशनमध्ये विविध कामांनिमित्त दररोज शेकडो नागरिक येत असतात. या नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी गैरसोय लक्षात घेऊन व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी यांनी ही यंत्रणा बसवण्याची इच्छा पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्याकडे व्यक्त केली होती. त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर तत्काळ ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.

पोलीस निरीक्षकांकडून पान 3 वर

# उपजिल्हा रुग्णालय परळी महाडायलिसिस सेंटर मध्ये जागतिक किडनी दिवस उत्साहात संपन्न




परळी (प्रतिनिधी):दिनांक 13 मार्च उपजिल्हा रुग्णालय परळी वैजनाथ येथील महाडायलेसिस सेंटर मध्ये जागतिक किडनी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ.शुभांगी मुंडे,डॉ.गणेश मुंडे,डॉ.झारकर, महाडायलीसिस चे इन्चार्ज डॉ.श्रेयस कराड यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी मुंजा गुट्टे, अशोक शिंदे, ईश्वर खरात,सोमनाथ गुट्टे, कृष्णा गुट्टे, कृष्णा आंधळे,अमोल वाघमारे, अविनाश व्हावळे,मंगेश गवळी,सोमनाथ गिरी आदी तंत्रज्ञ व कर्मचारी यांचीही उपस्थिती होती.अशा या पान 3 वर

# नवगण महाविद्यालयात स्व. यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात साजरी



परळी वैजनाथ : येथील नवगण शिक्षण संस्था संचलित नवगण महाविद्यालयात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. लालासाहेब घुमरे तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. बबन मोहिते उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पान 3 वर